# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 12 May 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १२ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगानं, राज्यात एकूण ५३ हजार ९५९ बॅलेट युनिट उपलब्ध करुन दिले आहेत. या टप्प्यात अकरा लोकसभा मतदार संघांमध्ये, मतदानासाठी २९ हजार २८४ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. या टप्प्यात उद्या होणाऱ्या मतदानासाठी या सर्व जिल्ह्यांची प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदान अधिकारी, कर्मचारी नियुक्त ठिकाणी रवाना झाले आहेत. मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्यात जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात उद्या १३ मे रोजी मतदान होत आहे. मतदारांना मतदारयादीत आपलं नाव शोधण्यासाठी निवडणूक विभागानं आपल्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याशिवाय मोबाइल एसएमएस सेवेद्वारेही मतदारांना ही सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदारांनी मोबाइलच्या मेसेज बॉक्समध्ये इंग्रजीत ईसीआय स्पेस आणि त्यानंतर आपला मतदार ओळखपत्राचा क्रमांक लिहून १९५० या क्रमांकावर मेसेज पाठवायचा आहे. या मेसेजच्या उत्तरात मतदार यादी क्रमांक आणि मतदार क्रमांक तत्काळ पाठवला जातो.

****

केंद्र सरकारच्या वतीनं देशभरात २०२२ ते २०२७ या कालावधीत उल्लास-नवभारत साक्षरता अभियान राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रात या अभियानात सहभाग घेऊन ४ लाख २५ हजार ९०६ जण साक्षर झाले आहेत. यामध्ये ६६ वर्षांपेक्षा अधिक वयाचे तब्बल ९६ हजार ५१८ परीक्षार्थी उत्तीर्ण झाल्याचं राज्याच्या शिक्षण संचालनालयानं काढलेल्या पत्रकात म्हटलं आहे. मागील

शैक्षणिक सत्रापासून या अभियानात सहभागी झालेल्या निरक्षरांची साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी परीक्षा १७ मार्चला घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व उपकेंद्रातील विभागांमध्ये, २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठीच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी, प्रवेश चाचणी परीक्षा-सीईटीच्या माध्यमातूनच प्रवेश होणार असल्याचं विद्यापीठानं स्पष्ट केलं आहे. सीईटीसाठी १५ ते २५ मे दरम्यान नोंदणी केली जाणार असून, त्यानंतर ३ ते १४ जून दरम्यान संबंधित विभागांमध्ये ऑफलाइन पद्धतीनं सीईटी होणार आहे.
सीईटीचे ५० टक्के आणि अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयाचे ५० टक्के गुण ग्राह्य धरून गुणवत्तेनुसार संबंधित अभ्यासक्रमात प्रवेश निश्चित केला जाणार आहे. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ऑनलाइन नोंदणी होणार असून, सीईटी परीक्षाही स्वतंत्रपणे आयोजित केलेली आहे. १०० गुणांच्या चा परीक्षेत एकूण ५० प्रश्न विचारले जातील, असं विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केलेल्या पत्रकात म्हटलं आहे आहे.

****

अमृतसर इथून सुटणाऱ्या अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेसची आज रविवारची फेरी रद्द करण्यात आली आहे.
दरम्यान, रेल्वे रुळाच्या कामांसाठी जालना जिल्ह्यात कोडी आणि रांजणी रेल्वे स्थानकांदरम्यान लाइन ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे दर मंगळवारी आणि शनिवारी काही गाड्या उशिराने धावणार आहेत. तर धर्माबाद-मनमाड ही गाडी आजपासून चार ऑगस्टपर्यंत धर्माबाद ते नांदेडदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

****

पॅरिस ऑलिंपिक २०२४ स्पर्धेसाठी, भारतीय कुस्तीपटू अमन शेरावतनं आपलं स्थान पक्कं केलं आहे. ही कामगिरी करणारा अमन हा पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला आहे. तुर्कियेतल्या इस्तंबूलमध्ये जागतिक कुस्ती ऑलिंपिक पात्रता फेरीत त्यानं ५७ किलो वजनी गटात फ्री स्टाइल प्रकारात विजय मिळवला.
दरम्यान, भारताच्या दिपक पुनियाला ८६ किलो वजनी गटात आपलं स्थान निश्चित करता आलं नाही.

****

इंडियन प्रीमियर लीग –आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने खेळवले जातील. पहिला सामना चेन्नई सुपरकिंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात दुपारी साडेतीन वाजता खेळवला जाईल. चेन्नईच्या एम. ए. चिंदबरम क्रीडा संकुलात हा सामना होईल, तर दुसरा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी क्रीडा संकुलात हा सामना खेळवला जाईल.

****

येत्या २४ तासांत राज्यात मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, तसंच गारांसह पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा इशारा विभागानं दिला आहे.

****